**नियमित दिवाणी दावा क्र. १०८६/२०२० मधील**
**निशाणी २५ वरील आदेश**
**(शैलजा बाळासो गायकवाड वि. भिकू गणपती गोरे)**

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दाखल केला असून वादीने असे कथन केले आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतींचे वाटप होवून मिळणेकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे. दावा मिळकत म्हणजे मौजे गोरेवाडी येथील गट नं.५ चे ७/१२ पत्रकी भोगवाटदार सदरी श्री.जनाबाई देवी या देवस्थानची नोंद आहे. देवस्थानची व्यवस्था पंच मंडळी पाहत असून दाव्याचे कामी तांत्रीक अडचण राहू नये याकरीता श्री.जनाबाई देवी देवस्थानतर्फे भंगवत उर्फ भगवान आण्णासाहेब गायकवाड यांना दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.३ म्हणून समाविष्ट करणेत यावे अशी वादीने विनंती केली आहे.

२. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन वादीची अर्जातील कथने नाकारली आहेत. प्रतिवादींनी असे कथन केले की, गट नं.५ चे ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता, श्री.जनाबाई देवी देवस्थान तर्फे पंच मंडळींची नावे ज्ञात होत असून वादी यांनी केवळ भंगवत उर्फ भगवान आण्णासाहेब गायकवाड हे वकील असलेची जाणीव असलेने त्यांना एकट्यांनाच पक्षकार करणेकरीता अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज चालणेस पात्र नसून नांमजूर करणेत यावा अशी प्रतिवादीने विनंती केली आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०१ नियम १० मधील तरतुदी मधील तरतुदीनुसार दाखल केला आहे. आदेश ०१ नियम १० अन्वये कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दाव्यामध्ये गुंतलेल्या सर्व प्रश्नांचा परिणामकारकरित्या व पुर्णपणे अभिनिर्णय करुन ते निकालात काढणे न्यायालयाला शक्य होण्यासाठी ज्या व्यक्तींची न्यायालयासमोर हजेरी आवश्यक असेल अशा व्यक्तीला दाव्यात पक्षकार म्हणून समाविष्ट करता येते. म्हणजेच तो व्यक्ती दाव्यात आवश्यक पक्षकार असतो.

५. प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादींविरुध्द वाटपाकरीता दाखल केला आहे. दाव्याचे अवलोकन केले असता, दावा मिळकत ही वादींचे सासरे कृष्णदेव जयराम गायवाड यांनी प्रतिवादी क्र.१ यांचे पुर्वहक्कदार गणपती गोरे यांचेकडून ४ आणे हिश्याची मिळकत

खरेदी केली होती. तसेच प्रतिवादींचे पुर्वहक्कदार यांनी दावा मिळकत गट नं.५ मधील दोन गुंठे क्षेत्र श्री.जनाबाई देवी देवस्थान यांना खरेदी दिले होते. सन २०१७ प्रतिवादी क्र.२अ चे पुर्वहक्कदार यांनी वादीस दावा मिळतीतील त्यांचे वहिवाटीस हरकत अडथळा केला. त्यामुळे वादीने गट नं.५ मधील वादीचा हिस्सा वाटून मागितला आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादींचे पुर्वहक्कदार यांनी गट नं.५ मधील क्षेत्र श्री.जनाबाई देवी देवस्थान यांना तबदील कले असलेने वाटपावेळेस त्यांचे कोणतीही हरकत असू नये असे अपेक्षीत असते. तसेच वादी व प्रतिवादी व देवस्थान यांचेमध्ये दावा मिळकतीबाबत भविष्यात निर्माण होणार वाद एकाचवेळी निर्णीत होणे गरजेचे आहे.

६. प्रतिवादींनी कथन केले प्रमाणे देवस्थानचे सर्व पंच मंडळींना दावेचे कामी समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्याकरीता निशाणी ६ येथे वादीतर्फे दाखल ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता, देवस्थान मिळकतीचे भोगवटादाराचे नाव सदरी सहा व्यक्तींची नावे नमुद आहेत. परंतू वादीने केवळ भगवान आण्णासाहेब गायकवाड यांचे एकट्याचे नाव प्रतिवादी म्हणून सामील करुन मागितले आहे. वादीने केवळ भगवान गायकवाड यांना एकट्यास सामील का करावे तसेच भगवान गायकवाड यांना इतर पंच मंडळींनी त्यांचे करीता अधिकारपत्र दिले असलेबाबत कोणताही पुरावा अथवा स्पष्टीकरण अर्जात नमुद केले नाही. त्यामुळे देवस्थान करीता केवळ एकाच पंच व्यक्तीस सामील करणे उचीत होणार नाही. तसेच देवस्थान पंच मंडळापैकी एकाच व्यक्तीने इतर व्यक्तींकरीता निर्णय घेतलेस इतर व्यक्तींच्या हक्कांवर देखील गदा येणार आहे. त्यामुळे वादीने देवस्थानच्या ७/१२ वरील सर्व पंच मंडळींना अथवा विश्वस्थांना पक्षकार म्हणून सामील करणे आवश्यक आहे. उपरोक्त सर्व कारणमिमांसेवरुन वादीचा अर्ज मंजूर करणे उचीत होणार नाही. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

वादीचा निशाणी २५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2024.11.10 17:30:14 +0530

दिनांक : ०४.१२.२०२४

**(श्रीमती अ.ब.सोनटक्के)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, विटा